# दि चिखली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड चिखली, जि. बुलडाणा.

## -: सभासदांना सूचना :-

०१) आपला पत्ता बदलला असल्यास बँकेकडे त्याची नोंद करा.

०२)बँकेच्या मृत सभासद कल्याण निधी योजने अंतर्गत सभासद होण्यासाठी नजीकच्या शाखेमध्ये संपर्क करावा व योजनेमध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा.

०३) करंट खात्यावर चेकने व्यवहार करतांना रकमेअभावी चेक परत जाणे, खातेदारास व बँकेस कमीपणा आणणारे आहे.

०४) कर्जाच्या परत फेडीच्या तारखा लक्षात ठेवाव्या. कर्ज खात्यात योग्य भरणा करीत राहिल्यास आपल्या व्याजात बचत होईल व आपणास थकित कर्जदार समजण्यात येणार नाही. आपले खाते एन.पी.ए. होणार नाही याची नियमीतपणे दक्षता घ्यावी.

०५)बँकेच्या कर्जदार सभासदांनी आपले कर्ज खाते नियमित ठेवावे. कॅश क्रेडीट, नजरगहाण खात्यात नियमानुसार चारपट उलाढाल करावी,शिल्लक मालाची मासिक साठा पत्रके बँकेस वेळेत सादर करण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच मुदती कर्ज (टर्म लोन) व वाहन कर्जाचे हप्ते व्याजासह मुदतीत भरावे.

०६)बँकेच्या कर्जदारांच्या कर्ज खात्याची माहिती रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीच्या साईटवर अपलोड करण्यात येत आहे याची नोंद घेण्यात यावी.

०७) शेअर्स अगर ठेवीकरीता वारस नोंदविला नसल्यास नोंदविण्याची काळजी घ्यावी.

०८) ग्राहकांनी कर्मचाऱ्यांकडून कार्यालयीन वेळेतच काम करून घेण्याची दक्षता घ्यावी.

०९)आपल्या बँकेमध्ये ज्या सभासदांचे बचत खाते नसेल त्यांनी जवळच्या शाखेत बचत खाते उघडावे म्हणजे डिव्हीडंडची रक्कम त्यांचे खात्यात जमा करणे सोईचे होईल.

१०) ज्या खातेदारांना ए.टी.एम. कार्ड हवे असेल त्यांनी ए.टी.एम. बाबतचा अर्ज जवळच्या शाखेत के.वाय.सी. व फोटो सहीत भरून द्यावा.

११) सभासदांनी के.वाय.सी. कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करावी अन्यथा सभासदत्व रद्द होईल.

१२) कृपया, आपला मोबाईल नंबर तसेच ईमेल आयडी (असल्यास) ची बँकेत नोंद करण्यात यावी.

१३) मोबाईलवर ज्यांना आपल्या खात्यावरील नोंदीची माहीती पाहीजे असेल त्यांनी कृपया फॉर्म भरून दयावा.

१४) ठेवी वरील आयकर कपातीसाठी ठेवीदारांनी आपल्या पॅन नंबरची झेरॉक्स प्रत बँकेत जमा करावी.

१५) सभासदांनी बँकेच्या आमसभेला हजर रहाणे, बँकेशी ठेव कर्ज व्यवहार करणे व रु १०००/– चे शेअर्स खरेदी करणे तसेच बँकेच्या विविध सेवेचा लाभ घेतल्यास अशा सभासदांना सक्रीय सभासद समजण्यात येईल अन्यथा निष्क्रीय सभासद समजण्यात येईल.

१६)दि चिखली अर्बन को–ऑप.बँक लि.चिखली व महाराष्ट्र शासनाचे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यांचे संयुक्त विद्यमाने १) वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना २) गट कर्ज व्याज परतावा योजना ३) गट प्रकल्प कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त सभासदांनी लाभ घ्यावा.अधिक माहितीसाठी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा